

Council of Education's
DESHBHAKTA RATNAPPA KUMBHAR COLLEGE OF COMMERCE,KOLHAPUR
(AN AUTONOMOUS COLLEGE)
Address- 649, C ward, RaviwarPeth, Azad Chowk, Kolhapur – 416 002.
Reaccredited with "A" Grade by NAAC

Principal
Dr. V. A. Patil
M. Com., M. Phil., Ph.D.

Phone: 0231-2641224
Email: info@drkcollegekolhapur.org
Website: www.drkcollegekolhapur.org

# राष्ट्रीय सेवा योजना

## शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
## देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर (स्वायत्त)
## राष्ट्रीय सेवा योजना: विशेष श्रमसंस्कार शिबिर (निवासी)
## दिनांक 16 डिसेंबर 2023 ते २२ डिसेंबर 2023
## ठिकाण: दत्तक गाव- संविधानगाव निमशिरगाव ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.
## अहवाल

शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूरच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचे स्वच्छ भारत अभियानास अनुसरून सात दिवसीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिर दि. 16 डिसेंबर 2023 ते 22 डिसेंबर 2023 या कालावधीमध्ये दत्तक गाव निमशिरगाव ता. शिरोळ जि. कोल्हापूर या ठिकाणी पार पडले. या विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये एकूण 52 स्वयंसेवक (40 मुली आणि 12 मुले) उपस्थित होते. तथापि दि. 20 डिसेंबर रोजी 2 मुली त्यांच्या पालकांबरोबर शिबिरामधून घरी परत गेल्या. अशाप्रकारे एकूण 50 स्वयंसेवकांनी (38 मुली व 12 मुले) हे श्रमसंस्कार शिबिर यशस्वीरित्या पूर्ण केले. या शिबिरामध्ये स्वयंसेवकांनी केलेल्या विविध कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे:

### दिवस पहिला: शनिवार दि. 16 डिसेंबर 2023

सकाळी ठीक नऊ वाजता शिबिरार्थी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी डॉ. अशोक बन्ने यांनी पार्वती देवी कुंभार कॉलेज ऑफ नर्सिंग, कोल्हापूर यांच्या बसमधून शिबिर स्थळाकडे प्रस्थान केले. शिबिराचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांचे अध्यक्षतेखाली पार पडले. उद्‌घाटन कार्यक्रमाकरिता निमशिरगावच्या सरपंच सौ अश्विनी गुरव प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच निमशिरगावच्या ग्रामपंचायत सदस्य सौ. राजश्री कोगले या सुद्धा

Principal
Dr. V. A. Patil
M. Com., M. Phil., Ph.D.

Phone: 0231-2641224
Email: info@drkcollegekolhapur.org
Website: www.drkcollegekolhapur.org

# राष्ट्रीय सेवा योजना

उपस्थित होत्या. उद्‌घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना प्राचार्य व्ही. ए. पाटील यांनी अशी श्रमसंस्कार शिबिरे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडविण्यासाठी आणि समाजाप्रती संवेदनशील बनण्यासाठी उपयोगी ठरतात असे प्रतिपादन केले. निमशिरगावच्या सरपंच सौ अश्विनी गुरव यांनी हे श्रमसंस्कार शिबिर निमशिरगावसाठी त्याबरोबरच शिबिरार्थीसाठी सुद्धा उपयोगी ठरेल आणि एक वेगळा अनुभव देऊन जाईल असा विश्वास व्यक्त केला. डॉक्टर बन्ने यांनी प्रास्ताविक केले. शिबिरार्थी स्वयंसेवक सिद्धेश जगताप याने आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेवक तरन्नुम आगा हिने तर आभार प्रदर्शन प्रतीक्षा कुडचे हिने व्यक्त केले. उद्‌घाटन समारंभासाठी महाविद्यालयाचे उप-प्राचार्य प्रा. आर. एस. नाईक, डॉ. श्रीपाद देसाई आणि नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सचे प्र. प्राचार्य डॉ. सुरेश फराकटे
उपस्थित होते.

उद्‌घाटन समारंभानंतर भोजन स्वतः तयार करून भोजनाचा आस्वाद घेऊन शिबिरार्थींनी थोडी विश्रांती घेतली. त्यानंतर कन्या विद्या मंदिर आणि कुमार विद्यामंदिर या राहण्याच्या ठिकाणची परिसर पाहणी करण्यात आली. शिबिरामध्ये विविध कार्ये नियोजनबद्ध रीतीने पार पाडता यावीत या दृष्टीने शिबिरार्थींची पाच गटांमध्ये विभागणी करण्यात आली. हे पाच गट म्हणजे न्याय, समता, बंधुता, एकता, आणि स्वातंत्र्य हे होय. या गटामध्ये अनुक्रमे 11, 11, 10, 10, आणि 10 शिबिरार्थी होते. प्रत्येक गटासाठी एक असे पुढीलप्रमाणे गटप्रमुख निवडण्यात आले- संकेत पोवार- न्याय, सानिका जाधव- समता, करण मिरजे- बंधुता, खुशाली तोडकर- एकता सिद्धेश जगताप- स्वातंत्र्य. प्रत्येक गटाकडे दि. 17, 18, 19, 20 आणि 21 यापैकी एका दिवसातील विविध कार्यक्रमांची संपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली. दरम्यान शिबिरार्थी प्रणाली थोरवत हिला तिच्या घरी असताना मांजर चावल्यामुळे कार्यक्रम अधिकारी डॉ. बन्ने यांनी इतर तीन शिबिरार्थींना बरोबर घेऊन तिला जयसिंगपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नेऊन उपचार करवून घेतले. शिबिरा दरम्यान रॅलीसाठी लागणारे बॅनर्स शिबिरार्थींनी तयार केले. आज मुलींच्या बरोबर रात्री प्रा. सौ. रेखा कुंभार निमशिरगाव या होत्या.

Principal
Dr. V. A. Patil
M. Com., M. Phil., Ph.D.

Phone: 0231-2641224
Email: info@drkcollegekolhapur.org
Website: www.drkcollegekolhapur.org

# राष्ट्रीय सेवा योजना

## दुसरा दिवस: रविवार दि. 17 डिसेंबर 2023

17 डिसेंबर या दिवशीच्या विविध कार्यक्रमाची जबाबदारी **न्याय** या गटावर होती. गटप्रमुख संकेत पोवार याने दिवसभरच्या कामाचे नियोजन केले. सूर्यनमस्कार आणि पसायदानाने दिवसाची सुरुवात झाली. चहापानानंतर सर्वप्रथम स्वच्छ भारत अभियानास अनुसरून आपण ज्या परिसरात राहणार आहोत त्या शाळेचा परिसर स्वच्छ करून कचरा मुक्त केला. साधारणपणे दोन तासाच्या श्रमदानानंतर शाळा परिसर स्वच्छ आणि चकचकीत झाला. पुढच्या टप्प्यामध्ये ग्राम स्वच्छता हाती घेण्यात आली. यामध्ये डॉ. आंबेडकर चौक, झेंडा चौक, जैन वस्ती परिसर इत्यादी परिसराची स्वच्छता केली. सदर स्वच्छता अभियानामध्ये चार टेम्पो कचरा कचरा गोळा करण्यात आला. श्रमदान/ग्रामस्वच्छता चालू असताना न्याय गटातील काही स्वयंसेवक दुपारच्या भोजनाची तयारी करीत होते. श्रमदानानंतर अंघोळ करून शिबिरार्थींनी जेवण करून विश्रांती घेतली. विश्रांतीनंतर प्रबोधनात्मक कार्यक्रमाअंतर्गत व्याख्यानाची तयारी करण्यात आली. चहा घेतल्यानंतर सायंकाळी पाच वाजता प्रबोधनात्मक व्याख्यान आयोजित करण्यात आले. व्याख्यानाचा विषय 'संविधान आणि भारताची संकल्पना' असा होता तर प्रमुख वक्ते प्रा. डॉ. अरुण शिंदे-नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स कोल्हापूर व संविधान अभ्यासक हे होते. या कार्यक्रमास श्री महावीर पाटील यांनी अध्यक्षस्थान भूषविले. कौन्सिल ऑफ एज्युकेशन कोल्हापूरचे सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम प्रमुख पाहुणे होते. तर नामदेव साजणे सर, सुरेश पाटील, नेमगोंडा पाटील, सुशांत पाटील, माजी सरपंच शांताराम कांबळे, सुरेश पाटील (धनाजी), कविवर्य विजय बेळंके, प्रा. नंदकुमार कुंभार व प्रा. रेखा कुंभार उपस्थित होते. प्रा. शिंदे यांनी संविधान निर्मितीचा इतिहास सांगून संविधानामधील भारत विषयक संकल्पना याविषयी विचार मांडले. डॉ विश्वनाथ मगदूम यांनी शिबिरार्थींना महात्मा गांधी आणि विनोबा भावे यांच्या जीवनावरील पन्नास पुस्तके भेट दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिबिरार्थी आदिती भालकर हिने केले. पाहुण्यांचे स्वागत प्रज्योत लोहार, आदिती पाटील, तरन्नूम आगा आणि मालिनी कदम या शिबिरार्थींनी केले. तर आभार

Principal
Dr. V. A. Patil
M. Com., M. Phil., Ph.D.

Phone: 0231-2641224
Email: info@drkcollegekolhapur.org
Website: www.drkcollegekolhapur.org



प्रदर्शन उमा पाटील या शिबिरार्थीने केले. विशेष कौतुकास्पद बाब म्हणजे सर्व पाहुण्यांना देण्यात आलेले बुके हे शिबिरार्थींनी परिसरात उपलब्ध असणाऱ्या फुले आणि पाने वापरून स्वतः तयार केले होते.

आजच्या दिवशी प्रा. (डॉ) के. जी. कांबळे, डॉ. एस. बी. राजमाने आणि श्री अजय नाईक यांनी शिबिराला सदिच्छा भेट देऊन शिबिरार्थींना प्रोत्साहन दिले व शिबिरार्थींबरोबर भोजनाचा आस्वाद घेतला.

व्याख्यानानंतर दिवसभरच्या कामाचा गटचर्चेद्वारे आढावा घेतला आणि भोजन करून शिबिरार्थी झोपी गेले. आज मुलींच्या बरोबर रात्री प्रा. सौ. रेखा कुंभार- निमशिरगाव या होत्या.

## तिसरा दिवस सोमवार दिनांक 18 डिसेंबर 2023

18 डिसेंबर या दिवशीच्या विविध कार्यक्रमाची जबाबदारी **समता** या गटावर होती. गटप्रमुख सानिका जाधव हिने दिवसभरच्या कामाचे नियोजन केले. सूर्यनमस्कार आणि पसायदानाने दिवसाची सुरुवात झाली. चहापानानंतर काल अपूर्ण राहिलेली ग्रामस्वच्छता हाती घेण्यात आली. यामध्ये बिरदेव मंदिर, भिलवड सिद्ध बिरोबा मंदिर, जैन मंदिर, ग्रामदैवत सिद्धेश्वर मंदिर, धनगर गल्ली, पाटील गल्ली, पाटील- धनाजी गल्ली, साजने-दुधाळी गल्ली, ढवळे-बेळंके गल्ली, शिंदे वाडा ते बागसार घर, टेकवाली गल्ली, रेडकर गल्ली इत्यादी भागात स्वच्छता करण्यात आली. आजच्या दिवशी सहा कचरा टेम्पो इतका कचरा गोळा करण्यात आला. दरम्यान कु. प्रणाली थोरवत हिला दानोळी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नेऊन रेबीजचे इंजेक्शन देण्यात आले. ग्रामस्वच्छता चालू असताना समता गटातील काही स्वयंसेवक दुपारच्या भोजनाची तयारी करीत होते. श्रमदानंतर अंघोळ भोजन आणि विश्रांती घेतली. त्यानंतर शिबिरार्थींनी आयुष्यमान भारत कार्ड कसे काढावे याची माहिती घेतली. आयुष्यमान भारत कार्ड नोंदणी चे प्रात्यक्षिक डॉ. यशवंत भोसले, डॉ. साहिल तांबोळी, सुपरवायझर आसमा

Council of Education's
DESHBHAKTA RATNAPPA KUMBHAR COLLEGE OF COMMERCE,KOLHAPUR
(AN AUTONOMOUS COLLEGE)
Address- 649, C ward, RaviwarPeth, Azad Chowk, Kolhapur – 416 002.
Reaccredited with "A" Grade by NAAC

Principal
Dr. V. A. Patil
M. Com., M. Phil., Ph.D.

Phone: 0231-2641224
Email: info@drkcollegekolhapur.org
Website: www.drkcollegekolhapur.org

# राष्ट्रीय सेवा योजना

शिकलगार, आशा सुपरवायझर पल्लवी कांबळे आणि आरोग्य सेविका एस. बी. कोलाज यांनी शिबिरार्थींना करून दाखवले. यावेळी 17 शिबिरार्थींनी स्वतःचे आयुष्मान कार्ड/ गोल्डन कार्ड काढले. चहा घेतल्यानंतर समता गटाने प्रबोधनात्मक व्याख्यानाची तयारी करून सायंकाळी ठीक पाच वाजता प्रबोधनात्मक व्याख्यान सुरू झाले. व्याख्यानाचा विषय 'नागरिकांसाठी विविध शासकीय योजना' हा होता. प्रमुख वक्ते श्री राजू जाधव ग्रामविकास अधिकारी निमशिरगाव हे होते तर अध्यक्षस्थानी श्री अनिल पाटील- चेअरमन, एन. बी. पाटील विकास सेवा संस्था, निमशिरगाव प्रमुख उपस्थिती- नामदेव साजणे सर. श्री जाधव यांनी ग्रामस्थांसाठी असणाऱ्या विविध शासकीय योजना आणि त्यांचा लाभ कसा घ्यावा याबाबतीत विस्तृत माहिती दिली. शिबिरार्थी प्रतीक्षा कुडचे हिने सूत्रसंचालन केले, संकेत कांबळे, अनुराग ठाणेकर, साक्षी चव्हाण यांनी स्वागत केले तर गौरी भोपळे हिने आभार मानले. आज महाविद्यालयातील प्रा. सौ. वृंदा लोखंडे ह्या मुलींच्याबरोबर रात्री उपस्थित होत्या.

## चौथा दिवस: मंगळवार दिनांक 19 डिसेंबर 2023

19 डिसेंबर या दिवशीच्या विविध कार्यक्रमाची जबाबदारी **एकता** या गटावर होती. गटप्रमुख खुशाली तोडकर हिने दिवसभरच्या कामाचे नियोजन केले. सूर्यनमस्कार आणि पसायदानाने दिवसाची सुरुवात झाली. चहापानानंतर एकता ग्रुपने जेवण तयार केले आणि तयार केलेले जेवण घेऊन सर्व शिबिरार्थी श्रमदानाकरिता तुकाई टेकडीकडे रवाना झाले. तूकाई टेकडीच्या पायथ्याशी आणि टेकडीवर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आगोदर वृक्षारोपण केलेल्या वृक्षांभोवती स्वच्छता व आळी करून वृक्षांना पाणी देण्यात आले. शिबिरार्थींनी तुकाई टेकडीवरच तुकाई देवीचे दर्शन घेऊन भोजनाचा आस्वाद घेतला. या निमित्ताने शिबिरार्थींना ट्रेकिंगचा अनुभवसुद्धा घेता आला. राहण्याच्या ठिकाणी परत येऊन शिबिरार्थींनी अंघोळ करून विश्रांती घेतली. त्यानंतर चहा घेऊन प्रबोधनात्मक कार्यक्रमाची तयारी करून सायं. 4.15 वाजता प्रबोधनात्मक व्याख्यान सुरू झाले. व्याख्यानाचा विषय 'विद्रोही तुकाराम' हा होता. प्रमुख वक्ते प्राचार्य अनिल कावनेकर, राशिवडे हे होते.

Principal
Dr. V. A. Patil
M. Com., M. Phil., Ph.D.

Phone: 0231-2641224
Email: info@drkcollegekolhapur.org
Website: www.drkcollegekolhapur.org

# राष्ट्रीय सेवा योजना

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नामदेव साजणे गुरुजी तर निवृत्ती साजणी सर, डॉ. नंदकुमार कुंभार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्राचार्य कावनेकर यांनी तुकारामांची परखडता आणि विचार याबाबतीत उपस्थितांचे प्रबोधन केले.

सायंकाळी पाच वाजता दुसरे व्याख्यान प्रबोधनात्मक आयोजित करण्यात आले होते. व्याख्यानाचा विषय- महात्मा गांधी: जीवन कार्य, वक्ते- प्रा. शांताराम कांबळे, जयवंत कॉलेज, इचलकरंजी, अध्यक्ष- इंजिनीयर, दीपक मगदूम, प्रमुख उपस्थिती- श्री महावीर पाटील, चेअरमन, निमशिरगाव विकास सेवा संस्था, पायगोंडा पाटील, आप्पा परीट, सौ शारदा कुंभार-सदस्य, व्यवस्थापन समिती, कुमार व कन्या शाळा, निमशिरगाव आणि दुधाने मॅडम इत्यादी.

गांधी शरीराने संपले असले तरी विचाराने ते कधीच संपणार नाहीत, गांधीजी डरपोक नव्हते तर ते निर्भय होते, निग्रही होते, असा नेता झालेला नाही आणि होणारही नाही त्यामुळे युवकांनी गांधी वाचणे गरजेचे आहे असे प्रतिपादन प्रा. कांबळे यांनी केले. शिबिरार्थी सृष्टी कांबळे हिने सूत्रसंचालन केले, श्रवण घेवडे आणि सौरभ कदम यांनी पाहुण्यांचे स्वागत केले तर समीक्षा पाटील हिने आभार प्रदर्शन केले. यानंतर भोजनाची तयारी, भोजन आणि गटचर्चा करून विद्यार्थी झोपी गेले. आज
मुलींच्या बरोबर प्रा. शमिका मुथाने रात्री उपस्थित होत्या.

## पाचवा दिवस: बुधवार दिनांक 20 डिसेंबर 2023

20 डिसेंबर या दिवशीच्या विविध कार्यक्रमाची जबाबदारी **स्वातंत्र्य** या गटावर होती. गटप्रमुख सिद्धेश जगताप याने दिवसभरच्या कामाचे नियोजन केले. सूर्यनमस्कार आणि पसायदानाने दिवसाची सुरुवात झाली. सुरुवातीला सर्व शिबिरार्थींनी आरोग्य आणि स्वच्छता जाणीव जागृती करिता गावामध्ये रॅलीचे आयोजन केले. त्यानंतर आरोग्य आणि आर्थिक- सामाजिक सर्वेक्षण करण्यात आले. आजच्या दिवशी दोन्ही सर्व्हेमध्ये प्रत्येकी 329 कुटुंबाचे प्रतिसाद मिळाले. दरम्यानच्या काळात स्वातंत्र्य टीम मधील

Principal
Dr. V. A. Patil
M. Com., M. Phil., Ph.D.

Phone: 0231-2641224
Email: info@drkcollegekolhapur.org
Website: www.drkcollegekolhapur.org


# राष्ट्रीय सेवा योजना

काही शिबिरार्थी दुपारच्या भोजनाची तयारी करीत होते. सर्व्हेनंतर शिबिरार्थींनी आंघोळ आणि जेवण करून विश्रांती घेतली. त्यानंतर प्रबोधनात्मक कार्यक्रमाची तयारी करण्यात आली. दुपारी चार वाजता आजच्या पहिल्या प्रबोधनात्मक व्याख्यानास सुरुवात झाली. विषय 'कवितेतून युवकांसाठी दिशादर्शन' हा होता. प्रमुख वक्ते आणि सदरकर्ते कविवर्य विजय बेळंके निमशिरगाव हे होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. नंदकुमार कुंभार होते. दुसरे प्रबोधनात्मक व्याख्यान सायंकाळी पाच वाजता आयोजित करण्यात आले. विषय होता 'ऑनलाइन फसवेगिरी पासून कसे वाचाल'. प्रा. संग्रामसिंह महाडिक, देशभक्त रत्नप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर हे वक्ते लाभले. अध्यक्षस्थानी नामदेव साजणे गुरुजी, निमशिरगाव. तर डॉ. नंदकुमार कुंभार श्री वीरेश बाळीकाई, श्री विवेक पाटील, श्री अजिंक्य मगदूम, श्री ओंकार मुगडे, श्री प्रतीक लोळगे, सौ शारदा कुंभार,श्री विनायक पाटील इत्यादी उपस्थिती होती. ऑनलाइन फसवेगिरी पासून वाचण्याबाबतच्या खबरदाऱ्या, खोट्या वेबसाईट कशा ओळखाव्यात, ऑनलाइन फसवणूक कशी होते आणि आपण त्यात अडकू नये म्हणून काय केले पाहिजे याबाबतची माहिती प्रा. महाडिक यांनी दिली. शिबिरार्थी कवलगी हिने सूत्रसंचालन केले. शंतनू तपासे, श्रीपाद खरसे आणि दीक्षा रोकडे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले तर सिद्धेश जगताप याने आभार प्रदर्शन केले. यानंतर भोजनाची तयारी, भोजन आणि गटचर्चा करून शिबिरार्थी झोपी गेले.

आज महाविद्यालयातील श्री वीरेश बाळीकाई, श्री विवेक पाटील, श्री अजिंक्य मगदूम, श्री ओंकार मुगडे, श्री प्रतीक लोळगे, श्री विनायक पाटील यांनी शिबिराला सदिच्छा भेट देऊन शिबिरार्थींना मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले तसेच शिबिरार्थींबरोबर भोजनाचा आस्वाद घेतला. आज मुलींच्या बरोबर प्रा. तुपे रात्री उपस्थित होत्या.

Principal
Dr. V. A. Patil
M. Com., M. Phil., Ph.D.

Phone: 0231-2641224
Email: info@drkcollegekolhapur.org
Website: www.drkcollegekolhapur.org

# राष्ट्रीय सेवा योजना

## सहावा दिवस: गुरूवार दिनांक 21 डिसेंबर 2023

21 डिसेंबर या दिवशीच्या विविध कार्यक्रमाची जबाबदारी बंधुता या गटावर होती. गटप्रमुख करण मिरजे याने दिवसभरच्या कामाचे नियोजन केले. सूर्यनमस्कार आणि पसायदानाने दिवसाची सुरुवात झाली. सुरुवातीला सर्व शिबिरार्थींनी आरोग्य आणि स्वच्छता जाणीव जागृती करिता गावाच्या उर्वरित भागांमध्ये रॅलीचे आयोजन केले. श्रमदानामध्ये प्रथम रत्नसागर हायस्कूलचे मैदान व एकूण परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर देशभक्त रत्नप्पा कुंभार यांच्या नियोजित स्मारकाच्या ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. श्रमदान नंतर गावाच्या उर्वरित भागातील कुटुंबांचा आरोग्य आणि आर्थिक सामाजिक सर्व्हे करण्यात आला. आज एकूण 81 कुटुंबांचे प्रतिसाद नोंदविण्यात आले. दरम्यान शिबिरार्थी प्रणाली थोरवत हिला कार्यक्रम अधिकारी डॉ. बन्ने यांनी इतर तीन शिबिरार्थींना बरोबर घेऊन तिला दानोळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नेऊन उपचार करून रेबीजचे दुसरेइंजेक्शन देण्यात आले.

शिबिरार्थींसाठी प्रोत्साहनात्मक घटना म्हणजे सर्वेक्षण चालू असतानाच शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. टी. एम. चौगुले आणि कोल्हापूर शहरराष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा. संदीप पाटील यांनी शिबिरास भेट दिली. डॉ. चौगुले यांनी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सरपंच सौ. अश्विनी गुरव आणि ग्राम विकास अधिकारी श्री राजू जाधव यांच्याशी चर्चा केली. यानंतर डॉ. चौगुले आणि प्रा. पाटील यांनी शिबिरार्थींच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. त्या ठिकाणी शिबिरार्थींनी दोघांचेही स्वागत केले. यावेळी डॉक्टर चौगुले यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना प्रतिपादन केले की या विशेष श्रमसंस्कार शिबिरामधून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होईल व त्यातून देशाचे सुजाण नागरिक घडतील. दरम्यानच्या काळात बंधुता गटाचे इतर शिबिरार्थी भोजनाच्या तयारीमध्ये व्यस्त होते. आंघोळ, भोजन आणि विश्रांतीनंतर पुढच्या सत्रामधील प्रबोधनात्मक कार्यक्रमाच्या आयोजनाची तयारी करण्यात आली. प्रबोधनात्मक व्याख्यानाचा विषय 'पर्यावरणाशी मैत्री' असा होता, वक्ते प्रा. एम. आर. पाटील देशभक्त रत्नप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर, अध्यक्ष पद्माकर पाटील, प्रमुख पाहुणे माजी खासदार राजू शेट्टी हे होते. निमशिरगावच्या सरपंच सौ अश्विनी गुरव, सावकर मादनाईक,

Principal
Dr. V. A. Patil
M. Com., M. Phil., Ph.D.

Phone: 0231-2641224
Email: info@drkcollegekolhapur.org
Website: www.drkcollegekolhapur.org

# राष्ट्रीय सेवा योजना

सुधाकर पाटील- शेतकरी संघटना निमशिरगाव, चेअरमन- महावीर पाटील, नामदेव साजणे गुरुजी, निवृत्ती साजणे गुरुजी, विजय बेळंके, प्रा. शांताराम कांबळे, चेअरमन- सुरेश पाटील, संजय पाटील (हमगोंडा), नेमगोंडा पाटील, आदगोंडा पाटील, कुबेर पाटील, प्रा. सौ. रेखा कुंभार, प्रा. डॉ. नंदकुमार कुंभार इत्यादी उपस्थिती होते. यावेळी बोलताना पर्यावरण रक्षणामध्ये युवकांनी विशेष योगदान देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्रा. एम. आर. पाटील यांनी केले. झाडे लावण्याबरोबरच त्यांचे जतन करणे ही काळाची गरज आहे असे प्रा. पाटील म्हणाले.

त्यानंतर भोजनाची तयारी आणि भोजन केल्यानंतर प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर करण्यात आला. विषय- वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चमत्कार. सादरकर्ते- सुनील स्वामी सर-अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कोल्हापूर. श्री स्वामी सर यांनी अंधश्रद्धा आणि चमत्कार यावर विविध प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले आणि शिबिरार्थींना अशा अंधश्रद्धांना बळी न पडण्याचे आवाहन केले. शिबिरार्थी डिंपल शर्मा हिने सूत्रसंचालन केले, प्रतीक्षा पाटील, दिव्या पाटील, समीक्षा पाटील, श्रुती कुंभार आणि पायल कांबळे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले तर अंकिता घोडके हिने आभार प्रदर्शन केले. यानंतर शिबिरार्थींनी उद्याच्या सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी केली व झोपी गेले. आज मुलींच्या बरोबर रात्री प्रा. सौ. रेखा कुंभार निमशिरगाव या होत्या.

आज शहाजी लॉ कॉलेजमधील श्री नितीन कुंभार आणि निमशिरगावच्या महिला उद्योजिका सुरेखा पाटील यांनी शिबिराला भेट देऊन शिबिरार्थींबरोबर सवांद साधला.

## सातवा दिवस शुक्रवार दिनांक 22 डिसेंबर 2023

आज शिबिराचा शेवटचा दिवस होता त्यामुळे बहुतांश शिबिरार्थी भावनिक झालेले दिसून आले. सूर्यनमस्कार आणि पसायदानाने दिवसाची सुरुवात झाली. यानंतर शिबिरार्थींनी सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे आपल्यातील कलागुण दाखवून दिले. यामध्ये प्रबोधनात्मक गीते, कविता वाचन, नृत्य,

Principal
Dr. V. A. Patil
M. Com., M. Phil., Ph.D.

Phone: 0231-2641224
Email: info@drkcollegekolhapur.org
Website: www.drkcollegekolhapur.org

# राष्ट्रीय सेवा योजना

शास्त्रीय गायन, ग्रुप डान्स, नाटक इत्यादींचे शिबिरार्थींनी सादरीकरण केले. उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उस्फूर्त प्रतिसाद दिला. सांस्कृतिक कार्यक्रमाकरिता नामदेव साजणे गुरुजी अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

यानंतर शिबिराच्या समारोपाचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निमशिरगावच्या सरपंच सौ अश्विनी गुरव या होत्या. तर प्रमुख उपस्थितीमध्ये देशभक्त रत्नाप्पा कुंभार पंचगंगा सहकारी कारखान्याचे माजी संचालक बाबगोंडा पाटील, उपसरपंच रोहित लोहार, ग्रामपंचायत सदस्य वैशाली पाटील, माजी खासदार राजू शेट्टी यांचे स्वीय सहाय्यक व ग्रामपंचायत सदस्य स्वस्तिक पाटील, ग्राम विकास अधिकारी राजू जाधव, कन्या विद्या मंदिरचे मुख्याध्यापक गावडे सर, नामदेव साजणे गुरुजी, संतोष आवटी, प्राध्यापक रेखा कुंभार इत्यादी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. अशोक बन्ने यांनी शिबिरामध्ये केलेल्या विविध कामांचा आढावा घेतला. तसेच निमशिरगावचे ग्रामस्थ, विविध संस्था, ग्रामपंचायत यांच्याकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल आणि आपुलकीबद्दल आभार मानले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ अश्विनी गुरव यांनी शिबिरार्थींनी निमशिरगाव मध्ये केलेल्या विविध उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून पुढील वर्षी सुद्धा निमशिरगाव मध्ये शिबिर आयोजित करण्याचे आवाहन केले आणि शिबिरार्थींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. श्री स्वस्तिक पाटील यांनी शिबिरार्थींनी गावामध्ये केलेल्या कामाचे कौतुक केले. यावेळी संकेत पोवार, आदिती भालेकर, प्रज्योत लोहार, श्रावण घेवडे या शिबिरार्थींनी मनोगत व्यक्त केले. तरन्नुम आगा हिने सूत्रसंचालन केले.

संपूर्ण शिबिर कालावधीमध्ये शिबिरार्थींबरोबर उपस्थित असणारे प्रा. डॉ. नंदकुमार कुंभार नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर व ग्रामपंचायत सदस्य निमशिरगाव यांनी आभार प्रदर्शन केले. त्यानंतर शिबिरार्थींनी सर्व पाहुणे ग्रामस्थ यांचा निरोप घेतला. प्रा. सौ. रेखा कुंभार आणि प्रा. डॉ. नंदकुमार कुंभार यांच्याशी शिबिरार्थींचे खूप चांगले बंध जुळले होते त्यामुळे त्यांचा निरोप घेत असताना

Principal
Dr. V. A. Patil
M. Com., M. Phil., Ph.D.

Phone: 0231-2641224
Email: info@drkcollegekolhapur.org
Website: www.drkcollegekolhapur.org

# राष्ट्रीय सेवा योजना

शिबिरार्थी भावनिक झाले होते. त्यानंतर भोजन करून शिबिरातील बरे वाईट अनुभव, आठवणी बरोबर घेऊन शिबिरार्थींनी कै. पार्वतीबाई कुंभार कॉलेज ऑफ नर्सिंग यांनी उपलब्ध करून दिलेल्या बसमधून कोल्हापूरकडे प्रयाण केले. या विशेष श्रमसंस्कार शिबिराद्वारे स्वयंसेवकांना खेडेगावातील जीवन जवळून पाहता आले, त्याचा अनुभव घेता आला, गावातील लोकांच्या समस्या, अडचणी याबद्धलची जाणीव निर्माण झाल्याचे दिसून आले. तसेच, पर्यावरण संरक्षण, स्वच्छता, आरोग्य , संविधान, अंधश्रद्धा निर्मुलन,सहजीवन, उपलब्ध संसाधनांच्या उपयोगातून कार्य करणे इ. विविध घटकांच्याबाबतीत प्रबोधन झाल्याचे दिसून आले.